तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील बैठकांमध्ये वृक्षलागवड आणि संगोपन हा मुद्दा स्थायी विषय म्हणून बैठकांच्या विषय सुची मध्ये आणि क्षेत्रीय स्तरावरील निरक्षण भेटीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अविवि २०१६/प्र.क्र.२५१/का.३
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: २० एप्रिल, २०१८

वाचा-

१) **शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.साववि-२०१६/प्र.क्र.१३१/फ- ११,दिनांक ३१.३.२०१६.**
२) **शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.साववि-२०१६/प्र.क्र.८०/फ- ११,दिनांक १०.१०.२०१६.**
३) **शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.साववि-२०१६/प्र.क्र.१६६/फ- ११,दिनांक ४.१.२०१७.**

प्रस्तावना

हवामान आणि ऋतुबदल,वाढते तापमान, दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष या नैसर्गीक आपत्तीची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी हरित महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०१७ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट्य ठरविण्यात आलेले असून, सन २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षोरोपण कार्यक्रमाची अंमलबजावणी झालेली आहे. त्याशिवाय सन २०१६ मध्ये दि.१ जुलै २०१६ या एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवडीचा आगळावेगळा व महत्वाकांक्षी कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला.

सन २०१८ आणि २०१९ मध्ये अनुक्रमे १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट्य आहे. वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य व्हावे आणि त्याचबरोबर आतापर्यंत लागवड केलेल्या झाडांचे संरक्षण, देखभाल आणि संगोपन उत्तमरितीने होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

दिनांक १ जुलै ते ७ जुलै, २०१७ या कालावधीमध्ये ४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाचे सादरीकरण मा.मंत्रीमंडळासमोर दि.१३ जुन,२०१७ रोजी करण्यात आली. त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार यासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या सहमतीनुसार सुचना प्रशासकीय विभागांना कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार या परिपत्रकाद्वारे त्यानुषंगाने सुचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

शासन निर्णय

अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत क्षेत्रीय स्तरावरील तालुका,जिल्हा आणि राज्यस्तरीय बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन या संदर्भातील विषय प्रत्येक बैठकांच्या वेळी विषयसुचीमध्ये स्थायी विषय म्हणून अंतर्भूत करण्यात यावा. अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवडीचा आढावा ,या पूर्वी लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण ,मृत झाडांच्या जागी नवीन झाडांची लागवड,पुढील वर्षामध्ये वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टांप्रमाणे वृक्षरोपणासाठी स्थळ निश्चिती, रोपांची उपलब्धता ,आवश्यक त्या तांत्रिक परिमाणाप्रमाणे विविध कालावधीमध्ये पिट्स तयार करणे, निधीची उपलब्धता इ.संदर्भात पूर्वतयारी बाबत आढावा घेण्यात यावा.

२ अशा बैठकांमध्ये वृक्षलागवड कार्यक्रमासंदर्भात झालेल्या निर्णयांची नोंद बैठकीच्या इतिवृत्तामध्ये करण्यात यावी. तसेच इतिवृत्तामध्ये नमुद केलेल्या निर्णयासंदर्भात झालेल्या अंमलबजावणीबाबत आणि येणाऱ्या अडचणीसंदर्भात पुढील बैठकींमध्ये चर्चा होऊन क्षेत्रीय अधिकाऱ्यांना येणाऱ्या समस्या आणि अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

३. तालुका,जिल्हा आणि राज्यस्तरावरील जे अधिकारी क्षेत्रीय कामांना भेटी देतील, त्यावेळी त्या-त्या विभागांतर्गत वृक्षलागवडीच्या स्थळांना आवर्जून भेटी देण्याचा कार्यक्रम आयोजीत करण्यात यावा. अशा क्षेत्रीय भेटीच्या वेळी संबंधीत प्रशासकीय विभागांतर्गत लावलेल्या झाडांचे संरक्षण योग्यरितीने होते किंवा नाही, मुर्त झाडांच्या बदल्यात नवीन झाडे लावली गेली किंवा नाही, पाण्याची व्यवस्था आणि संरक्षणासाठी मनुष्यबळ इ. बाबतची वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करावी.त्याचप्रमाणे येणाऱ्या अडचणी सोडविण्याबाबत उपाययोजना कराव्यात.

४. तसेच प्रस्तावित वृक्षलागवडीसाठी निवडलेली स्थळे, आवश्यक त्या परिमाणाचे पिट्स विहीत वेळेत तयार करणे आणि अशा स्थळावर लावण्यात येणाऱ्या झाडांसाठी पाण्याची आणि संरक्षण व्यवस्था, वृक्षलागवडीसाठी निधीची व्यवस्था, याबाबत देखील पाहणी करून क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन द्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२०१७०६४५७०१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=39e858554371a26f6672b036224cff0a48a63a836a4067a8da9a8cca6d83429e, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2018.04.20 17:07:12 +05'30'

(सं.छ.तडवी)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सर्व प्रशासकीय विभागाचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
२) कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
३) मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,औरंगाबाद,
४) व्यवस्थापकीय संचालक,मौलाना आझाद आर्थीक विकास महामंडळ मर्यादीत,मुंबई,
५) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई
६) अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी,मुंबई,
७) अल्पसंख्यांक विभागांतर्गत जिल्हास्तरावरील अधिकारी.
८) सहसचिव/ उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी,अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
९) सर्व प्रशासकीय विभागांतर्गत विभाग प्रमुख
१०) सर्व प्रशासकीय विभागांतर्गत महामंडळे/ मंडळे/ प्राधिकरणे.
११) सर्व विभागीय आयुक्त
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१४) सर्व आयुक्त महानगरपालीका,
१५) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपरिषद.
१६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख)महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजीक वनीकरण),महाराष्ट्र राज्य ,पुणे
१८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर
१९) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्या.,नागपूर
२०) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण)महाराष्ट्र राज्य,नागपूर
२१) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
२२) सर्व विभागीय वनाधिकारी,सामाजिक वनीकरण.
२३) सर्व वनसंरक्षक
२४) निवडनस्ती का.३.